2017-2018

ISSN 2393-8412

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for Social Sciences

# INDO ASIAN SOCIAL SCIENCE RESEARCH JOURNAL

(Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - IV, Issue - VII, Vol.- II Impact Factor 2.66 (GRIFI) Feb. 2017 To July 2017

IAP
INDO ASIAN PUBLICATION

EDITOR IN CHIEF

DR. SUMA S. NIRNI

IMPACT FACTOR 2. 66

ISSN 2393- 8412

International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for Social Sciences

डॉ. अंजय कदम

# INDO ASIAN SOCIAL SCIENCE RESEARCH JOURNAL

## REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue : VII, Vol. II**

**Year- IV, Bi-Annual (Half Yearly)**

**(Feb. 2017 To July 2017)**

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Website**
**www.irasg.com**

**Contact : - 02382 - 241913**
09423346913 / 09637935252
09503814000 / 07276301000

**E-mail :**
visiongroup1994@gmail.com
interlinkresearch@rediffmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
**Indo Asian Publication,**
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**

### EDITOR IN CHIEF

**Dr. Suma S. Nirni**
Dept. of History, G. P. Porwal Arts, Commerce &
V. V. Salimath Science College,
Sindgi, Dist. Bijapur (Karnataka)

### EXECUTIVE EDITORS

**Dr. Balaji G. Kamble**
Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur (M.S.)

**Dr. Lalita Chandratre**
PG Dept. of Education,
Kavikulguru Kalidas Sanskrit University,
Ramtek, Dist. Nagpur(M.S.)

### DEPUTY EDITOR

**Dr. Rajendra R. Gavhale**
Head, Dept. of Economics,
G. S. College,
Khamgaon, Dist. Buldhana (M. S.)

**Dr. Subhash J. Deshmukh**
Head, Dept. of Economics,
Dada Patil Rajale College,
Adhinathnagar, Dist. Nanded (M.S.)

### CO - EDITOR

**Dr. Shrikant Gaikwad**
Head, Dept. of Sociology,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latrur (M.S.)

**Dr. Dileep S. Arjune**
Head, Dept. of Economics,
J. E. S. College,
Jalna, Dist. Jalna (M.S.)

### MEMBER OF EDITORIAL BOARD

**Dr. Baban Todkar**
Head, Dept. of Difence Study,
New College,Ahmednagar,
Dist. Ahmednagar (M.S.)

**Dr. Arun Kumbhar**
Head, Dept. of Economics,
Arts & Commerce College,
Nesri, Dist. Kolhapur (M.S.)

**Dr. Kishorkumar Ghavane**
Head, Dept. of History,
Shankrrao Patil College,
Bhoom, Dist. Osmanabad (M.S.)

**Dr. Vinod Veer**
Head, Dept. of Geography,
Kishan Veer College,
Wai, Dist. Satara (M.S.)

**Dr. Shivraj Patil**
Dept. of Economics,
Swami Vivekanand College,
Shirur T., Dist. Latur (M. S.)

**Dr. Quadri Syed Javeed**
Head, Dept. of Psychology,
MSS ACS College,
Jalna Dist. Jalna (M.S.)

**Dr. Annasaheb Malasne**
Principal
Vidarbha Mahavidyalaya,
Buldhala, Dist. Buldhala (M.S.)

**Sandipan K. Gayake**
Dept. of Sociology,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

Issue - VII, Vol. II
IASSRJ
IMPACT FACTOR 2. 66
ISSN 2393-8412
Feb. 2017 To July 2017

# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Thoughts of Dr. Babasaheb Ambedkar about Right of Human Equality | Dr. D. P. Pawar | 1 |
| 2 | Analysis of Labour Welfare in India | Dr. Sunita Savarkar | 6 |
| 3 | Rural Development and the Need of Revival of Gandhian Cottage Industry | Dr. P. U. Athawale | 10 |
| 4 | Rural Development and MGNREGA | Dr. D. G. Ushir | 15 |
| 5 | Changes in Landuse efficiency in Marathwada Region | Dr. Angad K. Chitte | 19 |
| 6 | Review of E-Resources in College Libraries | Dr. Pandharinath S. Hirwe | 25 |
| 7 | कश्मिरी सूफीयाना - संगीत | डॉ.स्नेहल द. शेंबेकर | 30 |
| 8 | प्रजातंत्र पर डॉ. बाबासाहब आम्बेडकर के विचार | योगेश मधुकर चव्हाण | 33 |
| 9 | शाश्वत शेती विकास | डॉ. एच. डी. वागलगावे | 37 |
| 10 | राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक योगदान - एक अध्ययन | अरुण माने | 41 |
| 11 | आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत मुलींच्या सहभागावर त्यांच्या सामाजिक स्थितीच्या परिणामांचा अभ्यास | डॉ. संजय गहिनीनाथ कदम | 47 |
| 12 | शेतकरी वर्गासाठी महात्मा फुले यांचा आर्थिक दृष्टीकोन | डॉ. विलास भगवानराव भिल्लारे | 51 |

IMPACT FACTOR
2. 66

ISSN 2393-8412
Indo Asian Social Science Research Journal (IASSRJ)
Issue : VII, Vol.II
Feb. 2017 To July 2017
www.irasg.com

Research Paper **11** Physical Education

# आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत मुलींच्या सहभागावर त्यांच्या सामाजिक स्थितीच्या परिणामांचा अभ्यास

**डॉ. संजय गहिनीनाथ कदम**
शारीरिक शिक्षण विभाग,
नवगण शिक्षण संस्थेचे कला व विज्ञान
महाविद्यालय, चौसाळा, जि. बीड

**तावना:-**

मराठवाडा विभागातील परभणी जिल्हा निजाम कालावधीपासून रूढी व परंपरांचा प्रभाव सर्वात स्त प्रभाव असलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. नदी खोऱ्यांच्या बाबतीत सुजलाम असा हा प्रदेश हे पण निजाम कालावधीपासून शैक्षणिकदृष्ट्या पिछाडीवर आहे. पूर्वी पासून महिलांबाबत गोषा तीचा प्रभाव असलेला शिक्षणापेक्षाही वंशपरंपरेचा प्रभाव सामाजिक स्तरावर असणारा हा जिल्हा आहे. जिल्ह्या मधून हिंगोली जिल्ह्याची निर्मिती झाली. स्वातंत्र्योत्तर काळानंतर शिक्षणाचा प्रसार वाढत गेला बरोबर क्रीडा क्षेत्राचा प्रभावही वाढत गेला. मात्र शिक्षणामध्ये व क्रीडा स्पर्धेमध्ये संख्येच्या प्रमाणात लींचा सहभाग हा अल्प जाणवतो. म्हणून संशोधकाच्या मनात जिज्ञासा उत्पन्न झाली की, सामाजिक राचा मुलींच्या क्रीडा स्पर्धेतील सहभागावर कोणकोणते परिणाम होतात याचा अभ्यास करावा म्हणून ील संशोधन विषय निवडण्यात आला.

**ोधनाची उद्दिष्ट्ये:**

परभणी जिल्ह्यातील आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत मुलींच्या पालकांचा सामाजिक स्तराचा ींच्या आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा सहभागावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे, परभणी ल्ह्यातील मुलींच्या पालकांकडून मुलींना मिळणाऱ्या प्रोत्साहानाचा मुलींच्या खेळाच्या सहभागावर ारा परिणाम अभ्यासणे.

**तके :**

परभणी जिल्ह्यातील मुलींच्या पालकांकडून मुलींना मिळणाऱ्या क्रीडाविषयक प्रोत्साहानाचा ींच्या खेळाच्या सहभागावर समप्रमाणात परिणाम होतो, परभणी जिल्ह्यातील खेळाडू मुलींच्या पालकांचा ाजिक स्तर मध्यम स्तराचा आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा सदरील संशोधनाचे कार्यक्षेत्र परभणी जिल्हा असून त्यामधील आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत मुलींचा अल्प प्रतिसादावर पालकांच्या सामाजिक स्तराचा होणारा परिणाम याची तसेच परभणी जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयात कला शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्गातील मुलींपुरता मर्यादित आहे. सदरील संशोधन आंतरमहाविद्यालीयन क्रीडा स्पर्धेतील १८ ते २० वर्षे वयोगटातील मुलींपुरते मर्यादित आहे, सदरील संशोधनाचे कार्यक्षेत्र परभणी जिल्ह्यातील आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाज्या महाविद्यालयीन मुलींपुरता मर्यादित आहे, कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवीधर स्तरावर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींचा या संशोधनाचा विचार केला गेला आहे, सदरील संशोधनात संशोधन हे महाविद्यालयीन क्रीडा सोयीसुविधा, पालकांचा सामाजिक स्तर यांचा मुलींच्या आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील सहभागावर होणारा परिणाम यापुरता मर्यादित आहे.

**माहितीचे स्त्रोत :**

संशोधकाने संशोधनासाठी परभणी जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थिनींना आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यास येणाऱ्या अडचणी एक चिकित्सक अभ्यास करावयाचा आहे. त्यानुसार परभणी जिल्ह्यातील आंतरमहाविद्यालयीन मुलीच्या क्रीडा स्पर्धा सन २०१५-१६ व २०१६-१७ या शैक्षणिक वर्षांमध्ये सहभागी होणाऱ्या कला, वाणिज्य व विज्ञान शाखा अंतर्गत महाविद्यालयांची माहिती स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून प्राप्त केली. या महाविद्यालयापैकी सतत दोन्ही वर्षे मुलींच्या क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या महाविद्यालयांची नावे वर्गीकरण केले परभणी जिल्ह्यातून १५ महाविद्यालयाची नावे प्राप्त झाली. परभणी जिल्ह्यातील १० महाविद्यालय शहरी व पाच ग्रामीण महाविद्यालयाची निवड करण्यात आली. सदरील महाविद्यालयाची निवड करत असताना सुगम यादृच्छिक पद्धतीने निवड करण्यात आली. महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील सहभागी विद्यार्थिनींची माहिती त्या-त्या महाविद्यालयाचे प्राचार्य व क्रीडा शिक्षक यांचेकडून प्राप्त करून घेण्यात आली. या महाविद्यालयातील एकूण आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील सभागी विद्यार्थिनीची संख्या ही २२० एवढी आहे. त्याच महाविद्यालयातील त्याच वर्गात शिकत असलेल्या खेळाडू मुली संख्या एवढीच खेळाडू नसलेल्या मुलींची निवड (२२०) करण्यात आली.

**संशोधन साधनाची निवड:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण पद्धती वापरली असून, प्रश्नावली व पडताळा सूचीचा वापर केला आहे.

**प्रश्नावली :**

संशोधनासाठी माहिती मिळविण्याचे सोपे, उपुयक्त असे प्रश्नावली हे साधन आहे. वास्तविक प्रश्नावली प्रथमदर्शनी वाटते तेवढी सोपी, जलद, निश्चित फलित देणारी नसते. उलट, साध्य सिद्धीसाठी कालपव्यायी आणि अपूर्णतः, अनिश्चितता, प्रयोगाच्या असहकारी वृत्तीमुळे समाधानकारक फलिते असे साधन आहे. उत्तम प्रश्नावली तयार करण्यासाठी अतिशय श्रम, वेळ व कौशल्य आवश्यक असते. शैक्षणिक संशोधनात प्रश्नावलीचे महत्त्वाचे स्थान आहे. जी माहिती संकोचाने मुलाखतीने व्यक्त होत नाही. ती प्रश्नावलीद्वारे व्यक्त होते. सामाजिक स्तर मोजण्यांसाठी मान्यता प्राप्त मिश्रा डी. आणि सिंग

एच.पी. यांची प्रश्नावली मध्ये आवश्यक बदल करून प्रश्नावली तयार करण्यात येऊन सदरील प्रश्नावली सामाजिक स्तर मोजण्याचे साधन म्हणून उपयोगात आणली.

**जनसंख्या व न्यादर्श :**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठातील क्रीडा विभागाकडून प्राप्त माहितीच्या आधारे सुगम यादृच्छिक निवड पद्धतीने निवडण्यात आलेल्या महाविद्यालयातील एकूण सहभागी २२० मुलींशी त्यांचे महाविद्यालयाचे क्रीडाशिक्षक यांचे मदतीने संपर्क करून, प्रत्यक्षात भेटून माहितीचे संकलन केले. तसेच त्याच मुलींच्या त्याच महाविद्यालयातील त्याच वर्गातील खेळाडू मुलींच्या संख्येएवढे खेळाडू नसलेल्या मुलींची (२२०) निवड करण्यात आली व सर्व मुलींकडून माहिती चार प्रयत्नामधून संकलित करण्यात आली. म्हणून ४४० ही या संशोधनाची जनसंख्या आहे (n=४४०).

**माहिती संकलन कार्यपध्दती :**

संशोधन पथदर्शक व मुख्य अभ्यास या दोन स्तरावर केला. पथदर्शक अभ्यास- अर्थशास्त्र व शारीरिक शिक्षण शाखेतील डॉ. शाहू आणि डॉ. हुंबे या तज्ज्ञांनाबरोबर चर्चा करुन सामाजिक स्तर मोजण्यासाठी मिश्रा डी. आणि सिंग एच.पी. यांची मान्यता प्राप्त प्रश्नावलीपैकी काही प्रश्नामध्ये बदल करून प्रश्नावली तयार करण्यात आली. उपरोक्त प्रश्नावलीची वस्तुनिष्ठता, विश्वसनीयता व वैधता तपासून प्रश्नावली संशोधनाची साधने म्हणून वापरण्यात आली आहे. तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली नगरपालिका, व ग्रामीण स्तरावरील प्रत्येक एक महाविद्यालयाची सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने निवडण्यात येऊन कसोटी पुनरकसोटी, हाफ स्पिलीट पद्धतीने प्रश्नावलीची विश्वसनियता व वैधता तपासण्यात आली. सर्व प्रश्नावलींची विश्वसनियता, वैधता आणि वस्तुनिष्ठता उच्च प्रतीची पृथःकरणाद्वारे सिद्ध झाल्यामुळे सदरील प्रश्नावली संशोधन साधन म्हणून वापरण्यात आली. मिळालेल्या माहितीद्वारे प्रश्नावलीची विश्वसनियता, वैधता व वस्तुनिष्ठता उत्तम प्रतीची आल्यामुळे या प्रश्नावलीचा उपयोग माहितीचे संकलन करण्यासाठी साधन म्हणून वापर करण्यात आला.

मुख्य अभ्यास- पथदर्शक अभ्यासाद्वारे वैध प्रश्नावली ह्या सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने निवडलेल्या महाविद्यालयातील क्रीडा स्पर्धेतील सहभागी विद्यार्थिनीचे माहिती संकलित करण्यात येऊन या सर्व मुलींशी त्यांचे क्रीडाशिक्षकाबरोब चर्चा करून, वेळ निश्चित करून, मुलींना महाविद्यालयातील रिकाम्या वेळेत एका हॉलमध्ये एकत्रित करून संशोधनाचे महत्त्व व उद्देश स्पष्ट करून सर्व खेळाडू मुलींना प्रश्नावली वितरित करण्यात आली. व त्या मुलींकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली. प्रश्नावली भरत असताना ज्या प्रश्नांचे आकलन होत नाही व उत्तर लिहिण्यातील अडचण याबाबतीत विद्यार्थिनींना सहकार्य, प्रश्न व पर्याय समजावून सांगून केले. पहिल्याच प्रयत्नात प्रत्येक महाविद्यालयातून ८० टक्के पेक्षा जास्त प्रतिसाद मिळाल्यामुळे मार्गदर्शकांच्या सल्ल्यानुसार आणखीन तीन प्रयत्न करून सर्व मुलींकडून माहितीचे संकलन केले. अशा पद्धतीने एकूण ४४० विद्यार्थिनीकडून माहितीचे संकलन करून घेण्यात आले. उपलब्ध सर्व माहिती एकत्रित करून माहितीचे सांख्यिकीय पृथ्थकरण करण्यात आले.

**निष्कर्ष :**

परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील खेळातील सहभागी मुलींच्यां पालकांचा सामाजिक स्तर

हा मुलींच्या क्रीडा सहभागावर सकारात्मक परिणाम करणारा घटक आहे, परभणी जिल्ह्यातील महानगरपालिका भागातील खेळातील सहभागी मुलींच्या पालकांचा सामाजिक स्तर हा मुलींच्या क्रीडा सहभागावर सकारात्मक परिणाम करणारा घटक आहे, परभणी जिल्ह्यातील नगरपालिका भागातील खेळातील सहभागी मुलींच्या पालकांचा सामाजिक स्तर हा मुलींच्या क्रीडा सहभागावर सकारात्मक परिणाम करणारा घटक आहे, परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील खेळातील सहभागी मुलींच्या पालकांचा सामाजिक स्तर हा मुलींना पालकांकडून मिळणाज्या क्रीडा सोयींवर सकारात्मक परिणाम करणारा घटक आहे, परभणी जिल्ह्यातील महानगरपालिका भागातील खेळातील सहभागी मुलींच्या पालकांचा सामाजिक स्तर हा मुलींना पालकांकडून मिळणाऱ्या क्रीडा सोयींवर सकारात्मक परिणाम करणारा घटक आहे, परभणी जिल्ह्यातील नगरपालिका भागातील खेळातील सहभागी मुलींच्या पालकांचा सामाजिक स्तर हा मुलींना पालकांकडून मिळणाऱ्या क्रीडा सोयींवर सकारात्मक परिणाम करणारा घटक आहे.

**शिफारशी :-**

ग्रामीण व नगरपालिका विभागातील खेळातील सहभागी मुलींच्या पालकांचा सामाजिक स्तर व त्यांची खेळाविषयी सोयी यांचा सहसंबंध परिणामकारक आढळल्याने मुलींच्या खेळातील सहभाग वाढीचे उपाय योजना करत असताना मुलींच्या पालकांच्या सामाजिक स्तराचा परिणामकारकपणे विचार करावा, ग्रामीण व नगरपालिका विभागातील खेळातील सहभागी मुलींच्या पालकांचा सामाजिक स्तर मुलींच्या क्रीडा स्पर्धेतील सहभागावर परिणामकारक असल्याने मुलींच्या खेळाविषयी धोरण ठरवितांना पालकांच्या सामाजिक स्तराचा विचार करावा, ग्रामीण व नगरपालिका विभागातील खेळातील सहभागी नसलेल्या मुलींच्या पालकांचा सामाजिक स्तर व महाविद्यालयीन क्रीडा सोयी-सुविधा आणि खेळाविषयी धोरण ठरविताना मुलींच्या पालकांच्या आथिक स्तराचा विशेष दखल घेण्यात यावी, ग्रामीण व नगरपालिका विभागातील खेळातील सहभागी नसलेल्या मुलींच्या महाविद्यालयीन क्रीडा सोयी-सुविधा हा घटक महत्त्वपूर्ण आहे. म्हणून खेळातील प्रोत्साहनात्मक योजनाचा पुनर्विचार करून योजनेतील प्रोत्साहनात्मक घटकात वाढ करण्यात यावी, ग्रामीण व नगरपालिका विभागातील खेळातील सहभागी नसलेल्या मुलींच्या पालकांच्या मते खेळातील सहभागामुळे मुलीमधील सुंदरता व नाजूकता कमी होते, म्हणून प्रोत्साहन योजनेत मुलींच्या सुंदरता व नाजूकता टिकविण्याकडे उपाय योजना असाव्यात, शासनाने खेळाडूच्या समांतर आरक्षणामध्ये मुलींसाठी ५० टक्के आरक्षण ठेऊन याची अंमलबजावणी प्राधान्याने करावी व स्पर्धा व सराव शिबीरामध्ये मुलींच्या निवासाची व्यवस्था सुविधापूर्वक करावी.

## संदर्भ सूची :-


१. गोगटे भा.रा.- शारीरिक शिक्षण तत्त्वे व स्वरूप, अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळ, प्रकाशन, पुणे, १९६७.

२. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (मार्च-२०१५-१६ जिल्हा-परभणी)

३. श्रीपाल जर्दे- शारीरिक शिक्षण संशोधन: तंत्र व पद्धती, चंद्रमा प्रकाशन, कोल्हापूर, पृ. ८.